सातारा जिल्हा परिषद,सातारा
सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता : सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कॅम्प, ता.जि.सातारा
कार्यालय दूरध्वनी क्रं. 02162-295053 Email-dyceogadstr@gamil.com

जा.क्रं.आस्था-1(3)/ 143-174 /2026 दिनांक :- 06 /11/2026

प्रति,

1. खाते प्रमुख ---------- सर्व जिल्हा परिषद सातारा.
2. गट विकास अधिकारी, सर्व पंचायत समिती ----------

विषय :- अनुकंपा तत्वावर भरतीबाबत निव्वळ पात्र गट क व गट ड संवर्गाच्या उमेदवारांची अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाकडील पत्र जा.क्रं.आस्था-1(3)/30-62/2026 दिनांक 22/09/2026

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सातारा जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत सन 2025 मधील अनुकंपा नियुक्ती भरती प्रक्रिया पार पडली असुन सन 2026 मधील अनुकंपा नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार वरील संदर्भान्वये सर्व विभागप्रमुख, जि.प. व सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना तात्पुरती अनुकंपा प्रतिक्षासुचीचे प्रारुप देण्यात आले होते व त्यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या उमेदवारांच्या आक्षेप / हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. सदर पत्राच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांचे प्राप्त आक्षेप / हरकती यांची कार्यालयीन उपलब्ध नस्तींचे अवलोकन करुन आवश्यक ते आक्षेप / हरकती दुरुस्त करुन सदर आक्षेपांची नोंद संबंधित उमेदवारांच्या नावापुढे करण्यात आलेली आहे. तरी बदल केलेली गट क व गट ड ची अंतिम अनुकंपा प्रतिक्षासुची आपल्या अधिपत्याखाली असलेल्या उमेदवारांच्या निदर्शनास आणून द्यावी.

सोबत :- अनुकंपा उमेदवारांची अंतिम प्रतिक्षायादी गट क व गट ड

(निलेश घुले)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
सातारा जिल्हा परिषद, सातारा

Scanned with OKEN Scanner